MAY 2024 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE 8

DBJ NEWSLETTER

A Monthly Newsletter of D.B.J. College, Chiplun Dist. Ratnagiri (M.S.)



लोटे परशुराम येथील एक प्रसिद्ध कंपनी मे.कन्साई नेरोलॅक पेन्टंस यांनी आपल्या संस्थेला CSR योजनेअंतर्गत रू.15 लाखाचा चेक प्रदान केला.यावेळी कंपनीचे चिफ मॅनेजर ,HR व CSR India चे मा.संतोष देशमुख व लोटे HR चे प्रमुख मा.श्री.नंदन सुर्वे उपस्थित होते.

IN THIS ISSUE

DR. B.R. AMBEDKAR BIRTH ANNIVERSARY CELEBRATION

I.S.O. SURVEILLANCE AUDIT TEAM VISIT

CAREER KATTA

WORKSHOP ON N.E.P.2020

SANSKRIT CONVERSATION CLASS

SUPERANNUATION FUNCTION

COLLEGE NEWS

ABOUT THE ISSUE...

This month D.B.J. College has been a whirlwind of activity, reflecting the vibrant spirit of our institution. We've witnessed moments of commemoration, valuable external engagement, and exciting opportunities for our students.

First and foremost, we are immensely proud to announce a generous donation of Rs. 15 lakhs from M/s. Kansai Nerolac Paints, a renowned industrial leader situated in the Lote Parshuram Industrial Area. This contribution, made under their CSR initiative, will be instrumental in supporting the N.E. Society's endeavors to empower and uplift students from the Konkan region.

On another note, we welcomed an ISO audit team to our campus. Their visit served as an opportunity to showcase our dedication to quality and continuous improvement in all aspects of college life. Their feedback will be invaluable in helping us further refine our processes and enhance the student experience.

Furthermore, the Sanskrit department organized conversation classes, encouraging students to learn and engage with this ancient language. This initiative not only promotes cultural heritage but also broadens students' communication skills and perspectives.

Finally, this month saw the superannuation of Zoology Head Prof. Dr. G.B. Raje and Mr. S.L. Nirmal. We extend our sincerest gratitude for their dedication and service to the college. Their contributions have been instrumental in shaping countless lives, and their legacy will continue to inspire us.

As we move forward, let us carry the spirit of this month with us. Let's celebrate achievements, embrace new opportunities, and remain committed to excellence in all that we do.

Editor, DBJ Newsletter

डीबीजेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालयांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती साजरी करण्यात आली . यावेळी चिपळूणमधील प्रसिद्ध वक्ते श्री. मंदार ओक यांचे "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे आर्थिक विचार" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. माधव बापट उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. सुधीर मोरे यांनी प्रमुख वक्ते यांचा परिचय करून दिला. आपल्या मनोगतात बोलताना श्री. मंदार ओक यांनी डॉ. बाबासाहेब यांना जी म्हणून विशेषणे लावली आहेत ती केवळ औपचारिकता नाही तर खरंच बाबासाहेब यांचे जीवनकार्य अद्वितीय आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले आयुष्य उभं केलं. त्यांनी मांडलेले आर्थिक विचार आजही देशाला पुरक ठरत आहेत. असे मत त्यांनी व्यक्त केले, तर महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. जी. बी. राजे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या मनोगतात देशाचा विकास साधायचा असेल तर आजही बाबासाहेबांच्या विचारांशिवाय पर्याय नाही. शेती, उद्योग, शिक्षण यांचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे हे बाबासाहेबांचे विचार अत्यंत मूलगामी स्वरूपाचे होते असे मत त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. प्रकाश जोशी, मान्यवर, रजिस्ट्रार श्री. अनिल कलकुटकी, प्राध्यापक, शिक्षकेतर, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. सौ. सोनाली खर्चे यांनी केले.

आयएसओ समितीची डीबीजे महाविद्यालयाला भेट



नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षात शैक्षणिक मानांकनाला सामोरे जात आहे. यासाठी सोमवार दिनांक १५ एप्रिल रोजी आयएसओ समिती महाविद्यालयाला भेट देण्यासाठी दाखल झाली. या आधी मागील तीन वर्षांपासून डीबीजे महाविद्यालय आयएसओ मानांकन प्राप्त महाविद्यालय आहे. मात्र आताचे आयएसओ मानांकनाचे वेगळंपण म्हणजे हे मानांकन हे शैक्षणिक मानांकन आहे. यावेळी ऑडिटर म्हणून श्री. रत्नकुमार चंद्रात्रे, श्रीमती सेजल रूपलक, सल्लागार श्री. समीर रूपलक म्हणून काम पाहीले. .

महाविद्यायालयाचे प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी ऑडिटर समितीचे स्वागत केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. एस. चांदा, उपप्राचार्य प्रा. नामदेव तळप, पर्यवेक्षिका सौ. स्नेहल कुलकर्णी, रजिस्ट्रार श्री. अनिल कलकुटकी, आयएसओ समितीचे समन्वयक डॉ. बी. एस कांबळे या समितीमध्ये प्रा. डॉ चेतन आठवले, प्रा. डॉ. एस पी मोरे, प्रा. गौतम ब्रह्मे, प्रा. सौ. शिल्पा भिडे, प्रा. सौ. पुजा शिंदे, प्रा. सौ. सायली सुर्वे, प्रा. सौ. स्नैहल कुलकर्णी, प्रा. डॉ. सुजाता खोत, प्रा. सौ. शुभांगी इंगळे, प्रा. सौ. मिता तांबे, प्रा. सौ. कांचन तटकरे, प्रा. माधव ओक, प्रा. कोंडीराम सावरे, प्रा. मृण्मयी सोहनी, प्रा डॉ. गीतांजली माळी, प्रा. विनायक बांद्रे ही समितीचे सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंतजी शितोळे यांची महाविद्यालयास भेट



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत मा. प्राचार्य व समन्वयक यांच्या रत्नागिरी जिल्हास्तरीय बैठकीचे नुकतेच रत्नागिरी येथे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंतजी शितोळे यांनी डी. बी.जे. महाविद्यालयास भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी त्याचे स्वागत केले . यावेळी रत्नागिरी जिल्हा व महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वक प्रा. सुनिल भादुले यांनी महाविद्यालयाचे वतीने राबवित असलेल्या करिअर कट्टा व सेंटर ऑफ एक्सलन्स च्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी त्यांनी महाविद्यालयाचे करिअर कट्टा च्या विविध उपक्रमाचा आढावा घेतला व समाधान व्यक्त केले.

नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी व शिक्षककेंद्री आहे- प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर



नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवावा या उदात हेतूने तयार करण्यात आले आहे. या नवीन धोरणानुसार शिक्षकाने विद्यार्थ्यांना शिक्षण सुलभ करून देणाऱ्याची भूमिका राबवायची आहे. त्यासाठी शिक्षकांनी स्वतःचे ई -अभ्यासक्रम साहित्य तयार करावे. तसेच शिक्षणाच्या प्रवाहात राहण्यासाठी विद्यार्थ्यांना कायम प्रवृत्त करीत राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी कौशल्य आधारित अभ्यासक्रमाची निवड केली पाहिजे. कारण नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी व शिक्षककेंद्री स्वरूपाचे आहे, असे मत देवरुख येथील आठले -सप्रे-पित्रे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी मांडले. ते डीबीजे महाविद्यालयात आयोजित नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या विषयावरील परिसंवादात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

आपल्या भाषणात डॉ. तेंडोलकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये विविध उदाहरणांच्या रुपाने स्पष्ट केले. स्वयम सारख्या माध्यमचा वापर करून शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपले क्रेडिट पॉईंट्स वाढवावे असेही आवाहन त्यांनी केले. मनोगतानंतर अनेक विद्यार्थी तसेंच शिक्षकांच्या प्रश्नांना त्यांनी सोप्या भाषेत उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत बोलताना प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी स्कूल कनेक्ट या महाराष्ट्र शासनाच्या व मुंबई विद्यापीठाच्या उपक्रमाचे प्रमुख उद्देश विशद केले, तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार शाळा व महाविद्यालय यांच्याशी संपर्क साधून या धोरणाची माहिती देणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. बापट यांनी डीबीजे महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेताना नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षणाचा प्रसार होऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणात येण्याचे प्रमाण वाढावे यासाठी महाविद्यालय करिअर कट्टा यासारखे अनेक उपक्रम राबवत असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमाला नवकोकण एजुकेशन सोसायटीचे सेक्रेटरी श्री. अतुल चितळे, प्राचार्य डॉ. माधव बापट, उपप्राचार्य डॉ. एम. एस. चांदा, कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. ऋचा खवणेकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव तळप, पर्यवेक्षिका सौ, एस.एस. कुलकर्णी तसेंच जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. आर. भादुले, परिचय डॉ. ऋचा खावणेकर यांनी केले. आभार डॉ. बी. एस. कांबळे यांनी मानले.

संस्कृतभारतीची समीक्षायोजनागोष्ठी डी. बी. जे. महाविद्यालयात संपन्न



डी बी जे महाविद्यालयात संस्कृत भारती संस्थेची उत्तर रत्नागिरी जनपद समीक्षा योजना गोष्ठी आयोजित करण्यात आली. संस्कृतभारती ही सेवाभावी संघटना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्कृत प्रचार प्रसाराचे कार्य करते. आपल्या रत्नागिरी जिल्ह्यात या संस्थेच्या कार्याच्या स्थितीचा आढावा घेऊन पुढील कार्याचे नियोजन करण्यासाठी संस्थेच्या वतीने उत्तर रत्नागिरी जनपदसमीक्षायोजनागोष्ठीचे आयोजन गुरुवार दि. ११ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९.०० ते २.३० या वेळात डी.बी.जे. महाविद्यालयात करण्यात आले. या गोष्ठीमध्ये प्रमुख अतिथी म्हणून कोङ्कणप्रान्ताचे महाविद्यालयछात्रप्रमुख श्री. प्रणव गोगटे (मुंबई) आणि कोङ्कणप्रान्ताचे रत्नागिरी विभाग संयोजक श्री. मनोहर काजरेकर (सिंधुदुर्ग) हे उपस्थित होते. दापोली, खेड, गुहागर, चिपळूण तालुक्यातील संस्थेचे 15 सदस्य या गोष्ठीमध्ये सहभागी झाले.

सभेचे प्रास्ताविक जनपद मंत्री श्री. मुकेश बामणे (जालगाव, दापोली) यांनी केले. संस्कृतभारती संस्थेच्या संस्कृतसेवेच्या विविध उपक्रमांची माहिती उत्तर रत्नागिरी जनपद अध्यक्षा डॉ. सौ. माधवी दिपक जोशी (चिपळूण) यांनी करून दिली. प्रमुख अतिथी श्री. प्रणव गोगटे यांनी कार्यविस्ताराचा दृष्टिकोन विकसित करण्याची सूचना केली. तसेच श्री. मनोहर काजरेकर यांनी संस्कृतसेवाकार्याचे व्रत घेण्याचा सल्ला दिला. या सभेत संस्थेच्या गेल्या वर्षी झालेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच पुढील वर्षी नियोजित कामांची माहिती देण्यात आली.

वार्षिक नियोजन वेळापत्रकानुसार आपल्या तालुक्यातील कार्यक्रमांचे नियोजन करण्यात यावे यासाठी सदस्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जिल्हा समितीची रचना करण्यात आली आणि तालुकास्तरावर संयोजनाची जबाबदारी सदस्यांवर सोपविण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संस्कृत ध्येयमंत्रगायनाने व उद्घाटन दीपप्रज्वालनाने करण्यात आले. कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्कृतरक्षणगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता शांतिमंत्राने करण्यात आली.

डीबीजे महाविद्यालयात संस्कृत संभाषण शिबिराचे समापन



संस्कृतभारती (उत्तर रत्नागिरी) तर्फे संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन विद्याभारतीच्या सरस्वती शिशुमंदिरात बुधवार दि. १ मे ते शुक्रवार १० मे २०२४ या कालावधीत करण्यात आले. या शिबिराचा समापन कार्यक्रम आज संपन्न झाला. समापन कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून माखजन हायस्कूलचे निवृत्त संस्कृत शिक्षक श्री. सदाशिव बापट आणि डी.बी.जे. महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. स्नेहल कुलकर्णी हे उपस्थित होते. आपल्या भाषणात बापट सरांनी संस्कृतचे पाठांतर नको, संभाषणाने सराव करा, रामायणासारख्या ग्रंथांचे अध्ययन करा असा सल्ला शिबिरार्थींना दिला. संस्कृत आपल्या देशात सर्वांच्या हृदयांशी संवाद साधणारी भाषा आहे असे मत सौ. स्नेहल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास डी. बी. जे. महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख आणि संस्कृतभारतीच्या रत्नागिरी जिल्हा अध्यक्षा डॉ. सौ. माधवी दिपक जोशी उपस्थित होत्या. हाती घेतलेले काम पूर्ण होईपर्यंत उत्तम लोक थांबत नाहीत असे संस्कृत सुवचन आहे, त्यानुसार हाती घेतलेले संस्कृतच्या अध्ययनाचे काम सर्व शिबिरार्थींनी नित्य सुरू ठेवावे, संस्कृतच्या अभ्यासाचे व्रत घ्यावे, संस्कृतभारतीच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात डी. बी. जे. महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका आणि विद्याभारतीच्या रत्नागिरी जिल्हा अध्यक्षा सौ. सोनाली खर्चे आणि कार्यवाह सौ. छाया मुसळे उपस्थित होत्या. संस्कृतच्या उपक्रमांसाठी नेहमीच विद्याभारतीची संस्थेतर्फे साहाय्याची व सहकार्याची भूमिका असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमात शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. शिबिरातील सहभागी ज्येष्ठ नागरिक, शिक्षिका, गृहिणी, नोकरी करणाऱ्या महिला, शालेय विद्यार्थी अशा सर्वांनीच संभाषणप्रात्यक्षिक, विनोदकथन, कथाकथन, शिबिराचे अनुभवकथन, गीतगायन, सुभाषितपठन इत्यादि भाषिक कार्यक्रम सादर केले. चिपळूणमध्ये संस्कृतसंभाषणाचे असे आणखी वर्ग आयोजित केले जावेत अशी अपेक्षा शिबिरार्थी लोकांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, दीपप्रज्वलन करून आणि संस्कृत ध्येयमंत्र गायनाने झाली. तसेच सांगता शांतिमंत्राने आणि भारतमातेच्या प्रतिमेच्या अभिवादनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिरशिक्षिका गिरिजा चितळे आणि सूत्रसंचालन, आभारप्रदर्शन शिबिराच्या साहाय्यक शिक्षिका केतकी मुसळे यांनी केले.

या कार्यक्रमास लवेल येथील विश्वनाथ हायस्कूलमधील संस्कृत शिक्षिका आणि चिपळूणातील संस्कृत बालकेंद्राच्या शिक्षिका सौ. स्मिता सरदेसाई, अलोरे हायस्कूलच्या संस्कृतशिक्षिका सौ. देवकी खोत, गद्रे इं. स्कूलच्या शिक्षिका सौ. संगीता जोशी, संस्कृतभारती कार्यकर्ता सौ. मिताली केतकर (बिवली), आयुष आगवेकर (चिपळूण) व संस्कृतप्रेमी नागरिक उपस्थित होते.

प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी.बी. राजे आणि कर्मचारी श्री. एस.एल. निर्मळ यांची सेवानिवृत्ती







प्रा. डॉ. जी.बी. राजे यांच्या जीवनावरील लेखसंहग्रहाचे अनावरण करताना मान्यवर

College News

दै. प्रहार , १५-४-२०२४

PRAKASHAN राष्ट्र PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

डीबीजेत डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



चिपळूण (प्रतिनिधी)

येथील नवकोकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालयांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी चिपळूणमधील प्रसिद्ध वक्ते मंदार ओक यांचे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे आर्थिक विचार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्राचार्य डॉ. माधव बापट उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. सुधीर मोरे यांनी प्रमुख वक्ते यांचा परिचय करून दिला. आपल्या मनोगतात बोलताना मंदार ओक यांनी डॉ.बाबासाहेब यांना जी म्हणून विशेषणे लावली आहेत, ती केवळ औपचारिकता नाही, तर खरंच बाबासाहेब यांचे जीवनकार्य अद्वितीय आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले आयुष्य उभे केले. त्यांनी मांडलेले आर्थिक विचार आजही देशाला पूरक ठरत आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.जी. बी.राजे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या मनोगतात देशाचा विकास साधायचा असेल तर आजही बाबासाहेबांच्या विचारांशिवाय पर्याय नाही. शेती, उद्योग, शिक्षण यांचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे हे बाबासाहेबांचे विचार अत्यंत मूलगामी स्वरूपाचे होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ.माधव बापट यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश जोशी, रजिस्ट्रार अनिल कलकुटकी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. सोनाली खर्चे यांनी केले.

दै. नवराष्ट्र , १६-४-२०२४

नवराष्ट्र

आयएसओ समितीची डीबीजे महाविद्यालयाला भेट



चिपळूण, (वा.) येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षात शैक्षणिक मानांकनाला सामोरे जात आहे. यासाठी १५ एप्रिल रोजी आयएसओ समिती महाविदयालयाला भेट देण्यासाठी दाखल झाली. या आधी मागील तीन वर्षांपासून डीबीजे महाविद्यालय आयएसओ मानांकन प्राप्त महाविद्यालय आहे. मात्र आताचे आयएसओ मानांकनाचे वेगळंपण म्हणजे हे मानांकन हे शैक्षणिक मानांकन आहे. यावेळी ऑडिटर म्हणून रत्नकुमार चंद्रात्रे, सेजल रूपलक, सल्लागार समीर रूपलक म्हणून काम पाहणार आहेत. महाविद्यायालयाचे प्राचार्य डॉ माधव बापट यांनी ऑडिटर समितीचे स्वागत केले. यावेळी उपप्राचार्य डॉ एम.एस.चांदा.उपप्राचार्य प्रा.नामदेव तळप, पर्यवेक्षिका स्नेहल कुलकर्णी, रजिस्ट्रार अनिल कलकुटकी, आयएसओ समितीचे समन्वयक डॉ.बी.एस कांबळे, या समितीमध्ये प्रा.डॉ चेतन आठवले, प्रा.डॉ.एस पी मोरे, प्रा.गौतम ब्रह्मे, प्रा.शिल्पा भिडे, प्रा.पुजा शिंदे, प्रा.सायली सुर्वे, प्रा. स्नैहल कुलकर्णी, प्रा.डॉ.सुजाता खोत, प्रा.शुभांगी इंगळे, प्रा. मिता तांबे, प्रा. कांचन तटकरे, प्रा.माधव ओक, प्रा.कोंडीराम सावरे, प्रा.मृण्मयी सोहनी, प्रा डॉ. गीतांजली माळी, प्रा.विनायक बांद्रे हे समितीचे सदस्य उपस्थित होते.

Ratnagiri Plus Edition
16 April 2024 Page No. 3
epaper.navarashtra.com